# GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED

(Registration No: NBOM/CIDCO/HSG/(T. C)/10344/DR/2024-2025 DATED 05/09/2024)

PLOT NO. 4, NL-5, BUILDING NO : 7 TO 12, SECTOR-3, NERUL, NAVI MUMBAI 400 706.

Ref No. GCHSLTD/079 Date : 28/05/2025

## विशेष सर्व साधारण सभा

## नोटीस

**सर्व नोंदणीकृत सभासदांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 अंतर्गत कलम 79(अ) व महाराष्ट्र राज्य सहकार विभागाचा शासन निर्णय दि. 03.01.2009 अन्वये, तसेच मॉडेल उपविधींच्या अधीन राहून, पुनर्विकासासंदर्भात महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी खालीलप्रमाणे विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात येत आहे रविवार दि. १५ जून २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता संत श्री गजानन महाराज मंदिर, बँक्वेट हॉल, प्लॉट क्र.१७, सेक्टर-२९, नेरुळ बस डेपो , नेरुळ (पूर्व)-४०० ७०६ ह्या ठिकाणी आयोजित करण्यात येत आहे.**

## सभेमध्ये येणारे विषय

१. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नेमलेल्या M/s Dimensions Architects Pvt. Ltd. या संस्थेकडून व्यवहार्यता अहवालाचे (Feasibility Report) सादरीकरण.

२. गंगोत्री सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीकृत सदस्यांना शेअर प्रमाणपत्रांचे वितरण

३. मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने येणारे विषय.

टीप:

(अ) सभेच्या निर्धारित समयी गणसंख्येअभावी तहकूब केलेली सभा अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी अध्यक्ष्यांच्या परवानगीने सुरु करण्यात येईल,अशा प्रसंगी गणसंख्येची अट लागू होणार नाही.

(ब) फक्त नोंदणीकृत सभासदांनाच सभेमध्ये भाग घेता येईल. सह-सदस्यांनी उपस्थित राहावयाचे असल्यास, त्यांनी लेखी अर्ज सभेपुर्वी किमान ५ दिवस आधी सचिवाकडे सादर करावा.

**विनम्र निवेदन:**

सदर सभा अत्यंत महत्त्वाची असून, पुनर्विकासासंदर्भातील महत्त्वाचे निर्णय घेतले जाणार आहेत. त्यामुळे सर्व सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या सहकार्यातून संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान द्यावे,- सचिव गंगोत्री सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.)

GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED NAVI MUMBAI NBOM/CIDCO/HSG/(T. C)/10344/DR/2024-2025 DT 05/09/2024

GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED

CHAIRMAN SECRETARY TREASURER

Ref No GCHSLTD/080 Date : 18/06/2025

**विशेष सर्वसाधारण सभेचे (एसजीएम) इतिवृत्त**

गंगोत्री सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या), संस्थेच्या व्यवस्थापकीय समिती ह्यांची सभा, मंगळवार २७ मे २०२५ अन्वये, संस्थेच्या सर्व सभासदांची विशेष सर्व साधारण सभा रविवार दि. १५ जून २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता संत श्री गजानन महाराज मंदिर, बँक्केट हॉल, प्लॉट क्र. १७, सेक्टर-२९, नेरुळ बस डेपो, नेरुळ (पूर्व)- ४०० ७०६ ह्या ठिकाणी पार पडली.

सभेच्या निर्धारित समयी गणपूर्ती अभावी सभा अर्धा तास तहकूब करण्यात आली तदनंतर काहीच वेळात गणपूर्ती झाल्याने सभा सुरु करण्यात आली.

आजच्या विशेष सर्व साधारण सभेचे अध्यक्ष पद श्रीमती प्रतिमा शेट्टी ह्यांनी भूषवावे असे श्री. विशाल निकम ह्यांनी सुचविले असता सर्व सभासदांनी त्यास अनुमोदन दिले. त्यांनी सभेचे अध्यक्ष पद स्विकारले.

**अजेंडा क्र. १: पीएमसीचे सादरीकरण व पुनर्विकासाच्या अटींवर ठराव**

पार्श्वभूमी:

७९अ अंतर्गत शासन निर्णय (दिनांक ०३.०१.२००९) नुसार सोसायटीने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून डायमेन्शन्स आर्किटेक्ट्स प्रा. लि. यांची नियुक्ती केली.

पीएमसीचे उपस्थित प्रतिनिधी:

श्री अमित गाडे (पीएमसी प्रमुख व अधिकृत प्रतिनिधी), आर्किटेक्ट आकाश बारडे

पीएमसीने सविस्तर व्यवहार्यता अहवाल सादर करून सभासदांच्या सूचना व शंका स्पष्ट केल्या. यामध्ये क्षेत्रफळ गणना, आर्थिक लाभ, कॉर्पस, भाडे, तांत्रिक विशेषता, विकासक निवड व कायदेशीर बाबी यांचा समावेश होता. हे सादरीकरण मॉडेल बाय-लॉजच्या अॅपेंडिक्स-५ च्या मार्गदर्शक तत्वांनुसार करण्यात आले.

सभासदांच्या चर्चा व ठराव:

**ठराव १ अ – विकासक निविदा प्रक्रिया सुरु करण्याचा ठराव:**

पीएमसीस व्यवहार्यता अहवालानुसार विकासक निविदा प्रक्रिया सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

सूचक: श्री भरत कानेडे

अनुमोदक: श्रीमती शाईकला बानू

**ठराव १ ब – सदनिकांची रचना:**

सर्व सभासदांना पुनर्विकासानंतर ३ बीएचके सदनिका देण्याचे निश्चित करण्यात आले.

सूचक: श्री हरीश शेट्टी

अनुमोदक: श्री सुरेश शेट्टी

GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED NBOM/CIDCO/ HSG/(T. C)/10344/ DR/2024-2025 DT 05/09/2024 NAVI MUMBAI

# GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED

(Registration No: NBOM/CIDCO/HSG/(T. C)/10344/DR/2024-2025 DATED 05/09/2024)

PLOT NO. 4, NL-5, BUILDING NO : 7 TO 12, SECTOR-3, NERUL, NAVI MUMBAI 400 706.

Ref No. GCHSLTD 1080 Date : 18/06/2025

**ठराव १ क – कॉर्पस फंड:**
प्रति सभासद ₹ ३,००,०००/- कॉर्पस निश्चित करण्यात आला.

सूचक: श्री दिलीप बजारिया
अनुमोदक: मनोज जैन

**ठराव १ ड – पर्यायी निवासासाठी भाडे:**
सदस्यांनी निराकरण केले पुनर्विकासादरम्यान सदस्यांना ३०००० ते ४०००० पर्यंत भाडे मिळावे.

सूचक: श्री रासबिहारी सामंथा
अनुमोदक: श्री विलास चौधरी

**ठराव १ ई – अतिरिक्त सुविधा:**
विकासकाच्या विशेषतांमध्ये मॉड्युलर किचन समाविष्ट करण्याचे ठरविले.

सूचक: श्रीमती डिसूझा ब्लेसी पॉल
अनुमोदक: श्री निवृत्ती चौधरी

**अजेंडा क्र. २: शेअर सर्टिफिकेटचे वितरण**
बैठकीत उपस्थित असलेल्या पात्र सदस्यांना शेअर प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

सूचक: श्री अनिल मातेरे
अनुमोदक: श्री अरविंद गुप्ता

**अजेंडा क्र. ३: पाळीव प्राण्यांबाबत तक्रार**
इमारत क्र. ९ मधील सभासदांनी पाळीव प्राणी व स्वच्छतेबाबत तक्रार दाखल केली होती.
चर्चा व ठराव:
महानगरपालिका आरोग्य नियमावलीनुसार पाळीव प्राण्यांबाबत जबाबदारीचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले. संबंधित सभासदांना स्वच्छता राखण्यासाठी व नियमांचे पालन करण्यासाठी सूचना नोटीस दिली जाईल.

सूचक: श्री नंदरुप चौधरी
अनुमोदक: श्रीमती पुष्पा राजन

अखेर शेष विषय नसल्यामुळे सर्व उपस्थित सभासदांनी अशाच प्रकारे विशेष सर्व साधारण सभेमध्ये सक्रिय सहभाग घेऊन पुनर्विकास कामी सहकार्य करण्याचे आवाहन केले आणि सभासदांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे समापन करण्यात आले.

प्रति :-
१. सर्व सभासद
२. उपनिबंधक सहकारी संस्था (सिडको)

GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED NBOM/CIDCO/HSG/(T. C)/10344/DR/2024-2025 DT 05/09/2024 NAVI MUMBAI

GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED

CHAIRMAN SECRETARY TREASURER